ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १०   पुणें, बुधवार तारीख ९ जून, १९५४   अंक ११

## विविध माहिती

**नवीन मीटरगेज रेल्वे**—कच्छमधील भूजपासून आदिपूरपर्यंत अगदीं अरुंद रुळाची रेल्वे आहे. ह्या ३० मैलांच्या रेल्वेरस्त्याचे मीटरगेज रेल्वेरस्त्यांत रूपांतर करण्याचें रेल्वेबोर्डानें ठरविलें आहे. हें रूपांतर झाल्यावर हा रस्ता गांधीग्राम-दिसा रेल्वेला जोडण्यांत येऊन थेट दिल्लीपर्यंत मीटरगेज रेल्वेनें प्रवास करतां येईल. ह्या कामासाठी ४७ लाख रुपये खर्च येणार आहे.

**डबाबंद फळांचा कारखाना**—आसाम राज्य सरकारनें काचार जिल्ह्यांत चालू असलेल्या समाज–विकास योजनेच्या भागांत डबाबंद फळांचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्यासाठी १ लाख रुपये भांडवल लागणार आहे. ह्या कारखान्यामुळें लुशाई डोंगरांतील आणि काचार जिल्ह्यांतील आर्थिक दुरावस्था दूर होण्यास मदत होणार आहे. शिलाँगमध्यें फळें टिकविण्याचा एक कारखाना पूर्वीच काढण्यांत आला आहे.

**त्रावणकोर विद्यापीठाचें संशोधन**—त्रावणकोर कोचीनच्या विद्यापीठाच्या संशोधन खात्यानें शार्क लिव्हर ऑइल तयार करून उरलेल्या गाळापासून अ जीवनसत्व तयार करण्याच्या कृतीचा शोध लावला आहे. शार्क लिव्हर ऑइल तयार झाल्यावर 'स्टेरीन' नांवाचा निरुपयोगी पदार्थ रहातो. त्यापासून अ जीवनसत्व तयार करतां येतें आणि तें स्वस्तहि पडतें असें संशोधकांचें म्हणणें आहे.

**सायकलवरून मक्केचा प्रवास**—केट्टा येथील सहा मुसलमान तरुणांनीं हाजच्या यात्रेला सायकलवरून जाण्याचा बेत केला आहे. सध्या ते आपला मार्ग ठरवीत आहेत. मक्केला जाण्यासाठीं त्यांना इराण व इराकमधून प्रवास करावा लागेल.

**उत्तर प्रदेशांतील सांडपाण्याच्या योजना**—उत्तर प्रदेश सरकारनें राज्यांतील म्युनिसिपल संस्थांचा पाणीपुरवठा सुधारण्यासाठीं आणि सांडपाण्याची व्यवस्था करण्यासाठीं एक पंचवार्षिक कार्यक्रम आंखला आहे. म्युनिसिपालिट्या असलेल्या सर्व गांवांतून ह्यापुढील सर्व कार्यक्रम वरील योजनेप्रमाणें पार पाडण्याचें ठरलें आहे. ह्या कामासाठी ७·५ लाख रुपयांची तरतूद करण्याचेंहि सरकारनें ठरविलें आहे.

**खासदारांसाठीं ओळखपत्रें**—भारतीय रेल्वेमार्गावर प्रवास करतांना पार्लमेंटच्या सभासदांना ह्यापुढें तिकिटांऐवजीं आपलीं ओळखपत्रें दाखवावीं लागतील. पार्लमेंटच्या सभासदांच्या वेतनाबाबत जो नवीन कायदा मंजूर झाला आहे, त्याप्रमाणें प्रत्येक सभासदाला दुसऱ्या वर्गाचा बदल न करतां येणारा पास देण्यांत आला आहे. पार्लमेंटचा सभासद असेपर्यंत ह्या पासाचा उपयोग करून त्याला भारतामधील कोठल्याहि रेल्वेवर केव्हांहि प्रवास करतां येईल.

**विक्रीकराच्या उत्पन्नांत घट**—१९५३-५४ ह्या आर्थिक वर्षांत फेब्रुवारी १९५४ अखेर मद्रासमधील विक्रीकराच्या उत्पन्नांत घट झाली असल्याचें समजतें. ह्या कालांत २६६·५४ लाख रुपये विक्रीकर वसूल करण्यांत आला. गेल्या आर्थिक वर्षाच्या ह्याच काळांत २९१·५८ लाख रुपये विक्रीकर गाळा करण्यांत आला होता.

**आसाममधील नदी-सुधारणा-योजना**—आसाममधील नद्यांच्या पुरांना काबूंत ठेवण्याची एक बंधारा-योजना राज्य सरकारनें आखली असल्याचें कळतें. ह्या योजनेंत ब्रह्मपुत्रेवरील बंधाऱ्यांना स्थान देण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें ब्रह्मपुत्रा नदीच्या उपनद्यांवरहि नियंत्रण ठेवण्यांत यावयाचें आहे. संपूर्ण योजनेंत १०२ मैल लांबीचे बंधारे बांधण्यांत येतील.

**डेहराडून येथें जंगल–परिषद्**—येत्या डिसेंबरमध्यें डेहराडून येथें जंगलविषयक चौथी जागतिक परिषद् भरणार आहे. ही परिषद् संयुक्त–राष्ट्रसंघटनेच्या अन्न व शेतीसंघटनेच्या सहकार्यानें भारतीय सरकार भरवीत आहे. निरनिराळ्या देशांचे ३०० प्रतिनिधी परिषदेला हजर राहतील असा अंदाज आहे. उष्णकटिबंधांतील लांकडांचे उपयोग ह्या विषयावर परिषदेंत चर्चा होणार आहे.

**इंदूर येथें नवीन इस्पितळ**—इंदूर येथें ६० लाख रुपये खर्चून एक नवें इस्पितळ बांधण्यांत येत आहे. इमारतीचे ७ मजले बांधून पूर्ण झाले आहेत. सर्व इमारत येत्या वर्षअखेर पुरी होईल. इस्पितळांत ७०० रोग्यांची सोय करण्यांत येत आहे. स्वतंत्र विजेची व टेलिफोनची व्यवस्था हे ह्या इस्पितळाचे विशेष आहेत. इस्पितळांत १५० नर्सेस, २५५ डॉक्टर्स व ३०० इतर नौकर इतक्यांना काम मिळेल

**सूर्याच्या उष्णता-शक्तीचा उपयोग**—सूर्याच्या उष्णताशक्तीचा उपयोग कसा व कितीं करतां येईल ह्याचा विचार करण्यासाठीं रशिअन तज्ज्ञांची एक परिषद् ताश्कंद येथें भरली होती. सूर्याच्या उष्णतेचा उपयोग करून ४,००० डिग्री उष्णातामान निर्माण करण्यांत रशिअन शास्त्रज्ञांनीं यश मिळविलें आहे, असें समजतें. ह्या शक्तीचा उपयोग करून खाऱ्या पाण्याचें गोड्या पाण्यांत रूपांतर करतां येतें, असा त्यांचा दावा आहे.

**कॅनडाकडून रेल्वे बॉयलर्स आले**—कोलंबो योजनेप्रमाणें भारताला कॅनडाकडून मिळावयाच्या रेल्वेएंजिन्सचे कांहीं बॉयलर्स चित्तरंजन येथील रेल्वेएंजिनांच्या कारखान्यांत आले आहेत. त्यांचा उपयोग करून एंजिनें बांधण्यांत येणार आहेत. कोलंबो मदतयोजनेप्रमाणें भारताला १२० रेल्वेएंजिनें आणि ५० बॉयलर्स मिळावयाचे आहेत.

### भारतांत टेलिव्हिजन येण्याची शक्यता

भारतांत टेलिव्हिजन सुरू करणें कितपत शक्य आहे ह्यासंबंधी भारत सरकारच्या माहिती आणि नभोवाणीखात्यातर्फे चौकशी करण्यांत आली. टेलिव्हिजन उपयोगांत आणण्याचें ठरल्यास त्यासाठी खर्च किती येईल आणि त्याचा उपयोग किती होईल ह्यासंबंधी मुख्यतः अदमास घेण्यांत येत होता. ह्या चौकशीचा निष्कर्ष म्हणून असा अंदाज करण्यांत आला आहे कीं, भारतांत केवळ प्रयोगादाखल जरी टेलिव्हिजनचें एक प्रक्षेपण केंद्र उभारावयाचें झालें तरी त्यासाठी २२,००,००० रुपये खर्च करावे लागतील. टेलिव्हिजनवरील कार्यक्रम नीट प्रक्षेपित करण्याची मर्यादा अवघी २५ मैल आहे. त्याचा अर्थ असा कीं, भारतासारख्या विस्तीर्ण देशांत टेलिव्हिजनचा प्रसार करण्यासाठी कितीतरी प्रक्षेपणकेंद्रें उभारावीं लागतील. त्या मानानें रेडिओ-केंद्र उभारणें कमी खर्चाचें आहे. ५० किलोवॅट शक्तीच्या ध्वनिक्षेपण केंद्रावरील कार्यक्रम २०० मैलांच्या परिसरांत चांगले ऐकूं जाऊं शकतात, आणि ते उभारण्यासाठी १०,००,००० रुपये खर्च येतो. शिवाय, टेलिव्हिजनचे सेटस् फार खर्चाचे असतात. त्यामुळें ज्या शहरांतील राहणीचें मान फार श्रीमंती थाटाचें आहे, अशा मोठ्या शहरांतच टेलिव्हिजन आर्थिक दृष्टीनें स्वावलंबी होण्याची शक्यता आहे. सामाजिक उपयुक्ततेच्या दृष्टीनें टेलिव्हिजनपेक्षा ग्रामीण भागांत रेडिओचा प्रसार करणें अधिक इष्ट असल्यानें त्याकडे अधिक लक्ष देणें योग्य ठरणार आहे. टेलिव्हिजन सेटच्या पडद्यावर सध्यां फक्त छाया-प्रकाशयुक्त चित्रें दिसूं शकतात. परंतु ह्याच पडद्यावर रंगीत चित्रपटहि दाखविण्यांत येऊं लागलेले आहेत. ह्याहि दृष्टीनें परदेशांतील ह्यासंबंधीच्या प्रयोगाच्या तांत्रिक बाजूकडे लक्ष देणें अधिक योग्य ठरेल. टेलिव्हिजनचें प्रक्षेपण-केंद्र चालविण्यासाठी ब्रिटिश सरकारला आर्थिक मदत द्यावी लागते हें लक्षांत घेतां भारतांत ह्या कामीं सावधपणें पावलें टाकणेंच व्यवहार्य होईल, असें माहिती-खात्याचें मत आहे.

### भारत-पोलंड व्यापाराची शक्यता

पोलंडच्या सरकारचें एक व्यापारी प्रतिनिधी मंडळ सध्यां भारतांत आलें आहे. पोलंडमधील निरनिराळ्या उद्योग-धंद्यांचे व व्यापारी संस्थांचे ६ प्रतिनिधी मंडळांत आहेत. आंध्र चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेबरोबर वरील प्रतिनिधींनीं भारत-पोलंड व्यापारी देवघेवीसंबंधीं नुकतीच अनौपचारिक चर्चा केली, असें समजतें. आंध्र चेंबरचे अध्यक्ष श्री. सूर्यनारायण ह्याप्रसंगीं बोलतांना म्हणाले कीं, भारत आणि पोलंड ह्यांच्या दरम्यान व्यापारी करार आहे. तथापि पोलंड भारताकडून आयात करीत असलेल्या मालांत बरीच घट झाली असून उलटपक्षीं पोलंडकडून भारत आयात करीत असलेल्या मालांत मात्र हळूहळू वाढ होत चालली आहे. भारत आतां उद्योगधंद्यांच्या वाढीचा मार्ग जोरानें चालू लागला असल्यामुळें उभयता देशांच्या दरम्यान होणारा व्यापार बरोबरीच्या देवाणघेवाणीच्या नात्यानें झाला पाहिजे. भारतामधून कच्चा माल तर निर्यात होतोच, पण अलीकडे भारत रोज लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूहि निर्यात करूं लागलेला आहे. ह्या नवीन परिस्थितीशीं जुळवून घेण्याची तयारी पोलंडनें दाखविली पाहिजे, आणि भारताकडून कांहीं प्रमाणांत पक्का माल घेण्याचीहि इच्छा दाखविली पाहिजे. श्री. सूर्यनारायण ह्यांना उत्तर देतांना पोलंडच्या प्रतिनिधींचे पुढारी म्हणाले कीं, भारत व पोलंड ह्यांच्या दरम्यान अधिक निकटचे व्यापारी-संबंध प्रस्थापित होतील आणि त्यांचीं फळें दोन्ही देशांना मिळतील असा विश्वास वाटतो. पोलंड सध्यां मोठी अवजड यंत्रसामुग्रीच मुख्यतः निर्माण करीत आहे, पण भारतामधील ग्रामोद्योगांना उपयुक्त ठरेल अशा प्रकारची छोटी यंत्रसामुग्री पोलंड एकदोन वर्षांत तयार करूं लागेल. पोलंड भारताकडून करीत असलेली प्रत्यक्ष आयात कमी झाली असली तरी अप्रत्यक्षरीतीनें अशी आयात होतच असते. उदा. भारताचा चहा पोलंड लंडनच्या बाजारपेठेंत खरेदी करतें. भारत स्वतःच चहा निर्यात करूं शकेल ह्याची कल्पनाच आम्हांला नव्हती, असें पोलंडचे प्रतिनिधि म्हणाले.

### भारतांतील विमाकामांत वाढ

| वर्ष | चालू काम (कोटी रु.) | नवें काम (कोटी रु.) |
|---|---|---|
| १९२९ | १४२ | २९ |
| १९३९ | २७२ | ४७ |
| १९५२ | ९१६ | १४६ |

### १५ स्टेशन्सना विजेचा लाभ

दक्षिण रेल्वेवरील १५ स्टेशन्सवर चालू वर्षी विजेचे दिवे लावले जातील. त्यांतील अपर व थर्ड क्लास वेटिंग रूम्समध्यें विजेचे पंखे बसविले जातील.


**कण आणि क्षण**


(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

लेखक : श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

| गुजराती भाषांतर | मराठी आवृत्ति |
|---|---|
| प्रो. शशिन ओझा, भावनगर. | सहा महिन्यांत संपली |
| प्रस्तावना : मा. दादासाहेब मावळंकर | दुसरी आवृत्ति जून, १९५४ अखेर प्रसिद्ध होईल. |

**किर्लोस्कर**

**कॉटेज शेंगायंत्र**



शेंगदाणे न फुटतां शेंग फोडली जाते. बी-बियाणासाठीं उपयुक्त. दरेक तासास ८० पौंड शेंग फोडली जाते.

—अधिक माहिती मागवा—

**किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.**

# अर्थ

बुधवार, ता. ९ जून, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## १९५३ मधील भारतांतील बँकिंग

रिझर्व्ह बँकेचा बँकिंग कंपनीज ॲक्टच्या ३६ (२) कलमाखालील वार्षिक अहवाल* नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून असें दिसून येतें कीं अहवालाचे वर्षीं हिंदी बँकिंग योग्य पातळीवर येऊन स्थिरावलें. १९५१ मध्यें कोरियन युद्धानंतरच्या चलतीमुळें बँकिंगचा व्यवहार बराच वाढला होता, तर १९५२ साल नाणेंविषयक नवें धोरण पचनीं पाडण्यांत खर्च झालें होतें. १९५३ मध्यें आर्थिक उलाढाली व बँककर्जें ह्यांचा योग्य समन्वय झालेला होता. १९५१ मध्यें बँकांनीं दिलेल्या कर्जांत ११८ कोटी रु. ची वाढ झाली होती; १९५२ मध्यें ६६ कोटी रु. ची घट झाली व १९५३ मध्यें १० कोटी रु. ची पुनः घट झाली. उत्पादन वाढलें, किंमती वाढल्या तरी कर्जमागणी मर्यादितच राहिली व ती व्यवस्थितपणें भागविली गेली; बँकांवर अनिष्ट ताण पडला नाहीं. ह्याचें एक निदर्शक म्हणजे बँकांनीं पूर्वींच्या वर्षीपेक्षा बरींच कमी कर्जें रिझर्व्ह बँकेकडून घेतलीं. खालील तक्त्यांत त्यांचा तपशील दिला आहे:—

| मुदत | १७ (४) अ कलम | १७ (४) क कलम | एकूण कोटी रु. |
|---|---|---|---|
| १९५२ | १६४·२५ | ८१·४५ | २४५·७० |
| १९५३ | १२९·५८ | ६५·८४ | १९५·४२ |
| १९५४ (१जाने.ते१६ एप्रि.) | ६०·६८ | ५३·२२ | ११३·९० |

१९५२ चे मानानें १९५३ मध्यें रिझर्व्ह बँकेनें सर्वसाधारण बँकिंगसाठीं बँकांना ७०० ज्यास्त कर्जें दिलीं, पण त्या कर्जांची एकूण रक्कम ३५ कोटी रु. नीं उतरली. ह्या उलट, बिल मार्केट योजनेखालील कर्जांची सरासरी रक्कम मात्र वाढली. (१) सरकारी रोख्यांच्या तारणावर, (२) बिल मार्केट योजनेखालीं हुंड्यांचे तारणावर किंवा (३) ट्रेझरी बिलें रीडिस्कौंट करून बँका रिझर्व्ह बँकेकडून कर्जें घेतात. ज्यास्त बँकांना बिल मार्केट योजनेचा फायदा घेतां यावा, म्हणून ५ कोटी रु. पेक्षा अधिक ठेवी असणाऱ्या बँकांनाहि ती योजना लागू करण्यांत आली. म्हणून त्यापेक्षा लहान बँका अद्याप ह्या योजनेच्या कक्षेबाहेरच आहेत.

हिंदी बँकिंग क्षेत्रांतील सहकारी बँकांचें स्थान आतां बिगर शेड्यूल्ड बँकांचेपेक्षा जास्त महत्त्वाचें झालें आहे. १९५३ मध्यें रिझर्व्ह बँकेनें सहकारी बँकांना १३ कोटी रुपयांचीं ८८३ कर्जें मंजूर केलीं. त्यांवरील व्याजाचा दर १½% होता. तत्सम व्यवहार १९५० मध्यें ५ कोटी रु., १९५१ मध्यें ९ कोटी रु. व १९५२ मध्यें १० कोटी रु. असा होता. ठेवीदारांचे पैसे देण्यासाठीं म्हणून कोणत्याहि सहकारी बँकेला रिझर्व्ह बँकेची मदत मागावी लागली नाहीं.

बँकांच्या कचेऱ्यांची संख्या कमी होण्याचें अद्याप थांबलेलें नाहीं. शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची संख्या कायम राहिली, पण बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांच्या संख्येंत २५ ची घट झाली. एक्सचेंज बँकांनीं २ कचेऱ्या वाढविल्या, तर शेड्यूल्ड बँकांनीं २ कमी केल्या. शाखांच्या संख्येची वाढ व घट खालीं दर्शविली आहे :—

| एक्सचेंज बँका | इतर शेड्यूल्ड बँका | बिगर शेड्यूल्ड बँका |
|---|---|---|
| नव्या कचेऱ्या + ३ | नव्या कचेऱ्या + ९० | नव्या कचेऱ्या + ६ |
| कचेऱ्या बंद − १ | एक बँक शेड्यूलमध्यें आल्यामुळें वाढ + १ | तीन बँका शेड्यूलमधून काढल्यामुळें वाढ + ४७ |
| | कचेऱ्या बंद − ४६ | कचेऱ्या बंद −७७ |
| | तीन बँका शेड्यूलमधून काढल्यामुळें घट −४७ | एक बँक शेड्यूलमध्यें गेल्यामुळें घट −१ |
| निव्वळ वाढ, घट +२ | −२ | −२५ |

हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या परदेशांतील शाखांत ६ ची वाढ झाली. पाकिस्तानांतील आणखी एक शाखा बंद करण्यांत आली. २ लंडनमध्यें, १ एडन येथें, २ मोंबासा येथें आणि २ कंपाला येथें शाखा नव्यानें उघडण्यांत आल्या. हिंदी शेड्यूल्ड बँकांकडे परदेशांतील शाखांत ६७ कोटी रुपयांच्या ठेवी असून त्यांनीं तेथें ३६ कोटी रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत.

रिझर्व्ह बँकेच्या स्टाफ ट्रेनिंग कॉलेज योजनेनें बरीच प्रगति केली आहे. कॉलेज मुंबई येथें सुरू होणार असून परदेशांतील तज्ज्ञांचें सहकार्य मिळवून कॉलेजचा दर्जा अत्युच्च राखण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे.

पंचवार्षिक योजनेंत हिंदी बँकिंगच्या प्रसारास महत्त्वाचें स्थान आहे. बिनसरकारी नव्या औद्योगिक उपक्रमांस बँकांचें साहाय्य मोठ्या प्रमाणावर मिळणें आवश्यक आहे. त्या संबंधांत शिफारसी करण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें भारत सरकारशीं विचारविनिमय करून श्री. ए. डी. श्रॉफ ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली, तिचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्याचा परामर्श आम्हीं ह्याच अंकांत दुसरीकडे घेतला आहेच. व्यापार व उद्योग ह्यांच्याबाबत बँकांच्या वाढत्या उपयोगाप्रमाणेंच बँकिंगच्या ग्रामीण विभागांतील प्रसाराचेंहि महत्त्व मोठें आहे. ऑल इंडिया रूरल क्रेडिट सर्व्हेचा अहवाल खेडेगांवीं विभागांतील कर्जाची गरज व पुरवठा ह्यांवर बराच प्रकाश टाकील, अशी अपेक्षा आहे. रूरल बँकिंग चौकशी कमिटीच्या शिफारसींच्या अंमलबजावणीचें कामहि हळुहळू चालू आहे. सहकारी बँकांचें कार्यक्षेत्र वाढविण्याचे व ज्या राज्यांत केंद्रीय बँका नाहींत तेथें त्या स्थापण्याचे प्रयत्नहि चालू आहेत.

* ट्रेंड अँड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन इंडिया. किं. ३ रु. डिपार्टमेंट ऑफ रिसर्च अँड स्टॅटिस्टिक्स, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई १.

सहकारी पतपुरवठ्याशीं रिझर्व्ह बँकेचा घनिष्ट संबंध यावा याकरितां ज्या सहकारी बँका इच्छा दर्शवितील, त्यांची तपासणी करण्यास रिझर्व्ह बँक तयार असते.

ग्रेट ब्रिटनमध्यें मार्च, १९५२ मध्यें बँकरेट वाढविल्यापासून एक्सचेंज बँका त्या देशांत पैसे उभारण्याऐवजीं भारतांतच ठेवी-वर जास्त व्याज देऊन व सेव्हिंग्ज बँकेचा व्यवहार वाढवून हिंदी बँकांशीं स्पर्धा करूं लागल्या आहेत. त्यानंतर ग्रेट ब्रिटनमधील बँक रेट उतरला, तरी ठेवींसाठी स्पर्धा चालूच आहे. रिझर्व्ह बँकेचें ह्या घटनेकडे लक्ष आहे. हिंदी बँका व्याजाचे कमाल दर आपआपसांत समजुतीनें ठरवून त्याप्रमाणें वागतील अशी आशा आहे.

हिंदी बँका ट्रेझरी बिलांत पुरेशा रकमा गुंतवीत नाहींत, असें रिझर्व्ह बँकेचा आढावा म्हणतो. शेड्यूल्ड बँकांची गुंतवणूक मुख्यतः अल्प व दीर्घकालीन मुदतीचीच असते, ही गोष्ट योग्यच आहे, पण ट्रेझरी बिलांकडे त्यांनीं अधिक लक्ष पुरवावयास हरकत नाहीं. रोख व इतर बँकांतील रकमांचे खालोखाल ट्रेझरी बिलांतील गुंतवणूक सरती असते व ट्रेझरी बिलांचें रोकडींत रूपांतर सत्वर करतां येतें, त्यांवर व्याजहि समाधानकारक सुटतें. पाश्चात्य देशांत ट्रेझरी बिलांस जी पसंती दर्शविली जाते, तशी येथेंहि दाखविली जाणें बँकांच्या हितावहच आहे.

---

## ब्रिटिश विद्यापीठांचें बदललेलें स्वरूप

ब्रिटिश विद्यापीठांचें स्वरूप दुसऱ्या महायुद्धानंतर अगदीं पालटून गेलें आहे. पूर्वी ह्या विद्यापीठांतून फक्त श्रीमंतांचींच मुलें शिक्षण घेत असत. मोठ्या लोकांच्या मुलामुलींचें तारुण्य आनंदांत घालविण्याच्या संस्था अशा प्रकारचें कांहींसें स्वरूप त्यांना होतें. पण आतां विद्यापीठांतून सर्वच विद्यार्थ्यांना एकसारखें काम करावें लागतें अगर बाहेरचा रस्ता सुधारावा लागतो. विद्यापीठांतील जीवनाची कसोटी म्हणून फक्त कार्यक्षमतेलाच प्राधान्य दिलें जातें. प्रत्यक्ष करांचें ओझें वाढल्यामुळें ज्यांना श्रीमंत म्हणतां येईल अशांची संख्या फारच रोडावली आहे. जे थोडेसे श्रीमंत आहेत त्यांच्या मुलांना ह्याची जाणीव झालेली आहे, कीं परंपरागत श्रीमंती रहाणी टिकवून धरण्याचें काम आतां अधिक अवघड झालेलें आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सरकारकडून मदत मिळत असल्यामुळें अधिकाधिक विद्यार्थी विद्यापीठांत दाखल होत आहेत. युद्ध सुरू होण्यापूर्वीं ब्रिटनच्या तिजोरींतून दरवर्षी १,३६,००० पौंड इतकीच रकम शिष्यवृत्त्या व मदत म्हणून खर्च होत असे. आतां दरवर्षी ३५,००,००० पौंड खर्च करण्यांत येतात. ह्या वर्षी विद्यापीठांतून जितके विद्यार्थी शिक्षणासाठी येत आहेत त्यांपैकीं ७० टक्के विद्यार्थ्यांना सरकारकडून अगर स्थानिक संस्थांकडून ह्या ना त्या स्वरूपाची आर्थिक मदत मिळत आहे. ब्रिटनचें शिक्षणखातें ह्यावर्षी २,००० शिष्यवृत्त्या देत आहे. स्थानिक संस्थांकडूनहि ९,००० शिष्यवृत्त्या देण्यांत येत आहेत. शिष्यवृत्त्या देतांना विद्यापीठाची परिस्थिति, कुटुंबाचें उत्पन्न, विद्यार्थी घरीं रहात आहे कीं बाहेर, इत्यादि मुद्यांचा विचार करण्यांत येतो. त्याशिवाय, विद्यार्थ्यांच्या खर्चाला मदत म्हणून सुमारें २,८०,००,००० पौंड रकम ब्रिटिश सरकारकडून त्यांना मिळत असते, ती वेगळीच.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व्ह रु. ११,७०,१००
ठेवी .... .... .... रु. १,१९,११,७००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,९४,५००
शाखा:- बँकेचे सर्व व्यवहार केले जातात शाखा:-
दादर बेळगांव
माहीम पुणें

स्थापना १९१८


## लाकडापासून साखर

वर्ल्डक्रॉप्स, या मासिकाच्या एप्रिल, १९५४ च्या अंकांत या-संबंधानें कांहीं माहिती आली आहे. ती बरीच विचारप्रवर्तक होण्यासारखी आहे असें वाटल्यावरून थोडक्यांत संक्षिप्तरूपानें खालीं दिली आहे.

लाकडाचे तुकडे वगैरे भागापासून साखर तयार करतां येईल काय? या प्रश्नाचा विचार गेलीं ४० वर्षें चालू आहे. जर्मनी देशामध्यें असे प्रयोग चालू होते. परंतु पहिल्या जागतिक महायुद्धामुळें ते तसेच राहिले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत स्वीडन देशामध्यें निरुपयोगी लाकडापासून गूळ किंवा काकवी (मोलॅसीस) जनावरास खाद्य म्हणून देण्याकरितां करणें चालू होतें. परंतु लाकडापासून काकवी किंवा गूळ तयार करणें हें धान्याचा पुरवठा जेव्हां भरपूर असतो तेव्हां केव्हांहि फायदेशीर होत नाहीं. जर्मनीमध्यें बर्गिस पद्धतीनें लाकडावर रासायनिक क्रिया करून साखर तयार करतात. या क्रियेमध्यें हायड्रोक्लोरिक ॲसिडचा पुष्कळच उपयोग करावा लागतो व तें बरेंच महाग व खर्चाचें असतें. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीमध्यें या बाबतींत बरीच प्रगति झाली व आणखी कांहीं काळानंतर लाकडापासून साखर तयार करणें व्यापारीदृष्ट्या शक्य होईल असें दिसून आलें. लाकडापासून गूळ किंवा काकवी, जनावरांचे खाद्याच्या उपयोगी, किंवा त्यापासून अंबलेला पातळ पदार्थ अगर एक-प्रकारचा चांगला धागा देणारा पदार्थ ज्यास लिग्नीन असें म्हणतात हें तयार करणें शक्य आहे असें दिसून आलें आहे. धान्यापासून निघणाऱ्या डेक्सोट्रोस (ग्रेप शुगर) सारखा पदार्थहि लाकडापासून तेवढ्याच खर्चांत निघूं शकतो असेंहि समजून आलें आहे. परंतु लाकडापासून खाण्यास योग्य अशी साखर मिळणें हा खरोखरच रासायनिक शास्त्राचा मोठा विजयच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि, निर-निराळ्या देशांतील परिस्थितीवरूनच केवळ वरील जर्मन पद्धतीनें साखर करण्याच्या कृतीचा फायदेशीरपणा दिसून येईल. अमेरिकेसारख्या देशांत जेथें धान्याच्या थप्प्याच्या थप्प्या लागलेल्या आहेत. अशा देशामध्यें लाकडापासून ग्रेपशुगर काढण्यापेक्षा धान्यापासून काढणें फायदेशीर होईल. कारण तेथें धान्य जरूरीपेक्षा जास्त असल्यानें फुकट जाण्याचा संभव असतो. परंतु जर्मनीसारख्या देशांत जेथें धान्याची विपुलता मुळींच नसते, परंतु टाकाऊ लाकूड बरेंच आहे, तेथें लाकडाचा उपयोग या कामीं करणें फायद्याचें होतें. लाकडाच्या भुशाचा उपयोग साखर करण्याच्या कामीं होण्याइतकी प्रगति अद्यापि झालेली नाहीं, परंतु जर कां लाकडाच्या भुशापासून साखर तयार करतां येऊं लागली तर मात्र अधिक धान्याच्या उपयोगाच्या बाबतीसहि फारच मोठा धक्का बसेल, यांत शंका नाहीं.

# श्रॉफ कमिटीचा अहवाल

## खासगी उद्योगांना भांडवल पुरवठा

पंचवार्षिक योजनेच्या पूर्तीसाठी खासगी उद्योगांच्या वाढीस प्लॅनिंग कमिशननें महत्त्वाचें स्थान दिलेलें आहे. परंतु ह्या उद्योगांत अपेक्षित भांडवल आजपर्यंत गुंतविण्यांत आलेलें नाहीं, असें आढळून आलें आहे. भांडवल-निर्मिति व उत्पादक उपक्रमांची वाढ ह्यांवर करपद्धति व कर-आकारणी ह्यांचा अनिष्ट परिणाम होत आहे काय, ह्याची छाननी टॅक्सेशन इन्क्वायरी कमिशन करीत आहे. परंतु, खासगी उपक्रमांतील गुंतवणुकीवर परिणाम करणाऱ्या इतरहि कांहीं गोष्टी आहेत. टॅक्सेशन कमिशनच्या कक्षेबाहेरील गोष्टींतून खासगी उपक्रमांस अधिक भांडवलाचा पुरवठा कसा घडवून आणतां येईल, ह्याचा विचार करण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें टाटा सन्स लि. चे डायरेक्टर श्री. ए. डी. श्रॉफ ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी ऑक्टोबर १९५३ मध्यें नेमली. तिच्यांत श्री. जे. व्ही. जोशी ( रिझर्व्ह बँकेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर ), श्री. अनंतरामकृष्णन ( रिझर्व्ह बँकेच्या मद्रास लोकल बोर्डाचे सदस्य ), श्री. सी. डब्ल्यु. मिडलटन ( इंपीरिअल बँकेचे सेक्रेटरी व ट्रेझरर, मुंबई ), श्री. बी. टी. ठाकूर ( युनायटेड कमर्शिअल बँकेचे जनरल मॅनेजर ), श्री. व्ही. आर. सोनाळकर ( इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे मॅनेजिंग डायरेक्टर ) व श्री. बी. के. दत्त ( युनायटेड बँक ऑफ इंडिया लि. चे जनरल मॅनेजर ) हे सभासद होते.

### दोन समित्या

कमिटीचें काम चालू असतांना तिच्या नजरेस कित्येक बँकर्सनीं आणून दिलें कीं, वेगवेगळ्या इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलसच्या अवार्डसमुळें बँकांचा व्यवस्थाखर्च फारच वाढला असून त्यामुळें बँकिंगच्या प्रगतीस आळा बसत आहे व सहाजिकच खासगी उपक्रमांस भांडवल पुरविण्याची त्यांची क्षमता कमी होत चालली आहे. खर्चाचें हें प्रमाण वाढत चाललें तर बँकिंगच्या व्यवसायाच्या पायावरच गंडांतर येण्याची भीति त्या बँकर्सनीं व्यक्त केली. ह्या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करण्यासाठी कमिटीनें एक उपसमिति नेमली होती.

कित्येक बँकर्सनीं अशी तक्रार केली कीं, रकमा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पाठविण्याच्या सोयींचा ( रेमिटन्स फॅसिलिटीजचा ) भारतांत बराच अभाव आहे व त्यामुळें बँकांना जरा जास्तच पैसे रोख व इतर बँकांतून ठेवावे लागतात. ह्या सोयी वाढविल्या, त्यांचा खर्च उतरविला व वेळेची बचत झाली तर बँकांचें कर्ज देण्याचें सामर्थ्य वाढेल अशी त्यांची अपेक्षा. ह्या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करण्यासाठींहि कमिटीनें एक उपसमिति नेमली होती. ह्या दोन्ही समित्यांच्या सूचनांचा मुख्य कमिटीनें विचार करून स्वतःच्या शिफारशी केलेल्या आहेत.

### अनुकूल वातावरण हवें

भारताच्या पंचवार्षिक योजनेंत खासगी उपक्रमांस दिलेलें स्थान अत्यंत महत्त्वाचें आहे. संरक्षणाच्या व जिव्हाळ्याच्या इतर कांहीं बाबी सरकारी मालकीखाली व नियंत्रणाखाली रहातील; परंतु बाकीचें औद्योगिक क्षेत्र खासगी उपक्रमांस ( वैयक्तिक व सहकारी ) मोकळें ठेवण्यांत आलेलें आहे. एखाद्या उद्योगाची प्रगति असमाधानकारक वाटली, तरच मध्यें पडण्याचा विचार सरकार करील. पंचवार्षिक योजनेच्या यशासाठी सरकारी व खासगी, दोन्ही उपक्रमांची आवश्यकता आहे; त्यांचेमध्यें विरोध असण्याचें कारण नाहीं. शेतीच्या क्षेत्रांत सरकारनें कांहीं मूलग्राहि गोष्टींची ( पाणीपुरवठा, वीज, रस्ते, भांडवल पुरवठ्यासाठी संस्था, विक्रीची व्यवस्था, तांत्रिक सल्ला, इ. ) जबाबदारी पत्करली असली, तरी प्रत्यक्ष शेतीचें उत्पादन शेतकऱ्यांनींच करावयाचें आहे. कारखाने, बँकिंग, व्यापार, ह्यांच्या वृद्धीची जबाबदारी बहुंशीं खासगी प्रयत्नांवर टाकण्यांत आलेली आहे; सरकार अशा प्रयत्नांच्या यशासाठी आवश्यक तें वातावरण मात्र निर्माण करील. भांडवलाची उपलब्धता, ही बाब ह्या प्रयत्नांस आवश्यक असणाऱ्या इतर बाबींपैकीं केवळ एक बाब आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

श्रॉफ कमिटीनें खासगी औद्योगिक उपक्रमांच्या आर्थिक प्रश्नांवरच मुख्यत्वेंकरून भर दिलेला आहे. शेतीच्या कर्जपुरवठ्याच्या प्रश्नाचा विचार रूरल क्रेडिट सर्व्हे करीत असल्यानें, ती बाब श्रॉफ कमिटीनें विचारांत घेतलेली नाहीं. खासगी व्यापाराच्या क्षेत्रास पंचवार्षिक योजनेनेंच दुय्यम स्थान दिलेलें असल्यानें, श्रॉफ कमिटीनेंहि त्या क्षेत्राकडे विशेष लक्ष दिलेलें नाहीं; उत्पादक कारखानदारीच्या भांडवल पुरवठ्याचाच तिनें विशेष विचार केला आहे.

### बचतीचें महत्त्व

खासगी उत्पादनवाढीचा विचार केला, तर उत्पादनक्षमता वाढविण्यासाठींच २३३ कोटी रुपयांची आवश्यकता पंचवार्षिक योजनेंत नमूद आहे. यंत्रसामुग्रीच्या आधुनिकीकरणासाठी आणखी १५० कोटी रुपये खर्चावे लागतील. खेळतें भांडवल १५० कोटी रुपयांनीं ज्यास्त लागेल व इन्कमटॅक्स नियमांनीं मान्य केलेल्यापेक्षा ८० कोटी रुपयांच्या जादा घसाऱ्याची तरतूद लागेल. अशा रीतीनें, खाजगी उपक्रमांसाठी १९५१-५६ ह्या मुदतींत ६११ कोटी रु. भांडवलाची गरज आहे. ४२ प्रमुख उपक्रमांचीच ही गरज झाली. परंतु, कित्येक उद्योगांचें, विशेषतः लहान प्रमाणावरील उद्योगांचें, महत्त्व लक्षांत घेतां त्यांचेसाठी केलेली तरतूद अत्यंत अपुरी आहे. उद्योगधंद्यांतील गुंतवणुकीचीं लक्ष्येंहि फार मोठीं ठेवलेलीं नाहींत. तथापि, जनतेकडून मिळावयाच्या सहाय्याची अपेक्षा मात्र प्रत्यक्ष परिस्थितीच्या मानानें अवास्तव असल्याचें श्रॉफ कमिटीनें म्हटलें आहे. सरकारी उपक्रमांसच पुरेसा पैसा जनतेकडून मिळूं शकला नाहीं व जनतेच्या बचतीची सर्व शक्ति त्यावरच खर्च झाली, तर खासगी उपक्रमांस पैसा देण्यास जनतेजवळ साधनच उरणार नाहीं. पुरेशी अंतर्गत बचत किंवा परदेशांतील बचतीची आयात, ह्यांचेविना कार्यक्रमास पैसा कसा मिळणार ? उपलब्ध होण्याजोग्या बचतीचा ओघ योग्य दिशेनें वळविणें आर्थिक व्यवस्थेस शक्य आहे; पण मुळांतच पुरेशी बचत हवीना ! बचतच अपुरी असेल, तर केवळ हातचलाखीचा कांहींहि उपयोग होणार नाहीं. ह्या वास्तववादी भूमिकेवरूनच ह्या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे.

### केवळ मलमपट्टीचा उपयोग नाहीं

नवें भांडवल अपेक्षेप्रमाणें पुढें आलेलें नाहीं व १९५१-५३ च्या मानानें त्याची गुंतवणूक दुप्पट तरी झाली पाहिजे. यंत्रसामुग्रीचें आधुनिकीकरण व नव्या यंत्रांची उभारणी ह्यांतील मागासलेपणा बराच भरून काढावा लागणार आहे. मोठ्या कारखान्यांना खेळत्या भांडवलाचा तुटवडा अद्याप तीव्रतेनें भासूं लागलेला नाहीं; परंतु मध्यम व लहान आकाराच्या कारखान्यांना मात्र त्याची अडचण भासत आहे. बचत व त्याची गुंतवणूक

ह्यांची स्पर्धांचीच प्रवृत्ति चालू राहिली, तर पंचवार्षिक योजनेच्या यशास त्यामुळें मर्यादा प्राप्त होईल.

वेगवेगळ्या मार्गांनीं भांडवलाचा पुरवठा कसा वाढेल, ह्याची श्रॉफ कमिटीनें छाननी केली आहे. पैसे गुंतविणारा जो धोका पत्करतो, त्यामानानें त्यांच्या गुंतवणुकीला मोबदला मिळाला पाहिजे. ह्या मोबदल्याचा हिशेब मागणी–पुरवठ्याच्या व त्याच्या खर्चाच्या आकडेमोडीनेंच केवळ केला जात नाहीं. राजकीय, सामाजिक व मानसिक अशीं कित्येक कारणें मिळून त्याचें वातावरण निर्माण करीत असतात. केवळ आर्थिक दृष्ट्या एखादी गुंतवणूक आकर्षक वाटली, तरी ह्या कित्येक बिगर–आर्थिक बाबीहि मनुष्याच्या विचारावर परिणाम करीत असतात. अशा कित्येक बाबींत गेल्या कांहीं वर्षांत वाढ झालेली असून, खाजगी गुंतवणुकीस त्यामुळें प्रोत्साहन मिळणें अशक्य होतें. ह्या अडचणी दूर केल्याविना, कर्ज पुरविणाऱ्या संस्थांना मलमपट्टी लाविल्यानें औद्योगिक प्रगतीस अपेक्षित चालना मिळणार नाहीं. श्रॉफ कमिटीच्या शिफारसींचे परिणाम लक्षांत घेतांना ह्या इशाऱ्याची पार्श्वभूमि ध्यानांत बाळगली पाहिजे.

## श्रॉफ कमिटीच्या शिफारसी

### पुरेशी बचत असेल, तरच बाकीच्या गोष्टींचें महत्त्व

राष्ट्रीयीकरणाच्या टांगत्या तलवारीची भीति नष्ट केली पाहिजे. त्याच धंद्यांतील सरकारी मालकीच्या कारखान्यांची स्पर्धा खासगी कारखान्यांना होता कामा नये. परवाने, मंजुऱ्या, इत्यादींचें काम तातडीनें व्हावें. तांत्रिक सल्ला खासगी कारखानदारांना अधिक चांगल्या तऱ्हेनें उपलब्ध व्हावा. मजुरांच्या व नोकरांच्या उत्पादनशक्तीशीं विसंगत असें ज्यास्त वेतन त्यांना मिळणें कारखान्यांच्या वाढीस पोषक नाहीं. व्यावसायिक नीति वाढविण्याचा व्यापारी संघटनांनीं प्रयत्न करावा, म्हणजे शेअर्स व डिबेंचर्स ह्यांत पैसे गुंतविण्यास लोकांना भीति वाटणार नाहीं. नव्या कंपनी कायद्यांतील २७२ (ड) कलमांतून बँका वगळण्यांत याव्या. व्यापारी बँकांसंबंधीं आकडे प्रसिद्ध करण्याची अधिक पद्धतशीर व्यवस्था व्हावी. एखाद्या विशिष्ट कारणासाठी कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजनें मंजुरी दिली, परंतु त्या कारणासाठी रकम वापरणें संबंधित कंपनीला शक्य झालें नाहीं तर कंपनी गुंडाळून भागीदारांना भांडवल परत देवविण्याची सत्ता सरकारला असावी. आपलें कर्जविषयक व रीडिस्कौंटविषयक धोरण रिझर्व्ह बँकेनें सुधारावें, म्हणजे बँकांना ज्यास्त पैसा कर्जाऊ देता येईल. व्यापारी बँकांनीं आपलीं धोरणें सुधारून भांडवल पुरवठ्यास मदत करावी, परंतु स्वतःच्या स्थैर्यास धक्का पोचूं देऊं नये. व्यापारी बँकांनीं दीर्घ मुदतीचीं कर्जें स्वतःच्या जबाबदारीवर दिलीं, तर त्यांनीं त्यांच्या तारणावर रिझर्व्ह बँकेकडे कर्ज मागण्याच्या प्रवृत्तीस प्रोत्साहन मिळूं नये. पहिल्या दर्जाच्या औद्योगिक कंपन्यांच्या भागांत व डिबेंचर्समध्यें बँकांनीं अधिक पैसा गुंतवावा, अशा शेअर्सच्या व डिबेंचर्सच्या तारणावर लायक लोकांना अधिक कर्जें द्यावीं व इंडस्ट्रिअल कॉर्पोरेशन्ससारख्या संस्थांच्या भांडवलउभारणीस हातभार लावावा. औद्योगिक कंपन्यांचे शेअर्स अंडरराइट करण्यासाठी प्रमुख बँकांनीं व विमा कंपन्यांनीं मिळून इंपीरिअल बँकेच्या नेतृत्वाखाली एक सिंडिकेट काढावी, त्यासाठी इंपीरिअल बँक कायद्यांत जरूर ती दुरुस्ती करण्यांत यावी. इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स ह्यांचे शेअर्स व बाँड्स, त्यांचे तारणावर कर्ज देण्यासाठी, सरकारी रोख्यांसमान मानण्यांत यावेत. ह्या शेअर्सची खरेदी–विक्री होऊं शकावी ह्यासाठी ते धारण करण्यावरील कायद्याचीं बंधनें दूर करावींत. वेगवेगळ्या इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलसच्या निवाड्यामुळें बँकांच्या व्यवस्थाखर्चांत झालेल्या वाढीचा, खर्चांत एकसूत्रीपणा आणण्याचा व खर्चाचा बोजा कमी करण्याचा विचार करण्यासाठी सरकारनें एक तज्ज्ञ समिति नेमावी. कांहीं ठराविक मर्यादेपर्यंत गिऱ्हाइकांच्या वतीनें गॅरंटी व इंडेम्निटी देण्यास व स्थानिक आणि निमसरकारी संस्थांच्या ठेवी स्वीकारण्यास लायक अशा बँकांची यादी मध्यवर्ती व राज्यसरकारांनीं रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानें तयार करावी. इन्कमटॅक्स व सेल्सटॅक्स खातीं बँकांकडून माहिती अधिकारानें मागवितात, त्यांत सुधारणा झाली नाहीं तर बँकिंगच्या प्रगतीस अडथळा येईल; लोकांचे पैशाचे व्यवहार गुप्त न रहाणें त्यांना खपणार नाहीं. लहान बँकांच्या विशेष अडचणी लक्षांत घेऊन, रिझर्व्ह बँकेनें, बँकिंगच्या तत्त्वांस बाध येऊं न देतां कोणत्या बाबतींत निर्बंध सैल करतां येतील व सवलती वाढवितां येतील ह्याचा विचार करावा. १ कोटी रुपयांच्या ठेवींपेक्षा ज्यास्त ठेवी असणाऱ्या सर्व बँकांना बिल–मार्केट योजनेचा फायदा मिळावा. वैयक्तिक बिलाची किमान रकमहि कमी असली तरी चालावी. वेगवेगळ्या बँकांकरितां "लिमिटस्" मोसमाचे आधीं घालून देण्यांत याव्या. मोसमांत व्यापार व उद्योग ह्यांची नड बँकांना भागवावी लागते, त्याच वेळीं सरकारांनीं आपले कर्जरोखे विक्रीस काढूं नयेत. बिल मार्केट योजनेप्रमाणें दुसरी एखादी योजना मध्यम मुदतीच्या कर्जासाठी चालू करण्याची शक्यता रिझर्व्ह बँकेनें अजमावून पहावी. रेमिटन्सच्या सोईंत आणखी वाढ करण्यांत यावी व त्यासाठी टेलिप्रिंटर्स, तारांचे खास वर्ग, इत्यादींची व्यवस्था व्हावी. भारताबाहेरील हिंदी बँकांत रिझर्व्ह बँकेस खातीं उघडता यावीं, ह्यासाठी रिझर्व्ह बँक कायद्याचें १७ (१३) हें कलम दुरुस्त करण्यांत यावें.

लायसनदार शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे आपला शाखाविस्ताराचा कार्यक्रम मंजुरीसाठी पाठवावा व त्यानुसार शाखा उघडणाऱ्या बँकांना आर्थिक मदत देण्याची योजना रिझर्व्ह बँकेनें भारत सरकारच्या साह्यानें आखावी. शाखा उघडण्याच्या प्रारंभीच्या खर्चासाठी एकरकमी देणगी आणि कांहीं किमान मुदतींत गोळा केलेल्या ठेवींवर कमिशन, अशा प्रकारचें त्या मदतीचें स्वरूप असावें. अविकसित क्षेत्रांत कांहीं ठराविक मुदतीपर्यंत (उ. ५ वर्षे) एकापेक्षा अधिक बँक कचेऱ्या उघडूं न देण्याच्या इष्टतेचा रिझर्व्ह बँकेनें विचार करावा. ग्रामीण विभागांतील बँकांच्या संरक्षणाची राज्य सरकारांनीं जरूरीप्रमाणें पुरेशी व्यवस्था करावी. फिरत्या (मोबाइल) बँकांना प्रोत्साहन देऊन मदत करावी. डिपॉझिट इन्शुअरन्स योजनेचा आणखी खोलवर विचार व्हावा व ती योजना अमलांत आणावी असें तपशीलवार विचारांतीं बँकांना वाटलें, तर ती सुरू करावी. खात्यांत पुरेसे पैसे नसतांना चेक काढणें हा फौजदारी गुन्हा ठरविण्यांत यावा; रिझर्व्ह बँकेनें ह्या बाबीची छाननी करावी. असे चेक ज्या खात्यांवर काढण्यांत येतील, तीं खातीं बँकांनीं आपण होऊनच बंद करावींत. बँकर्सच्या हितसंबंधांचें संरक्षण करण्यासाठी व सर्वांच्याच सामान्य हिताबाबत समजोता निर्माण करण्यासाठी बँकांची एक 'ऑल इंडिया असोसिएशन' स्थापन करण्यांत यावी. सावकार व श्रॉफ ह्यांस रिझर्व्ह बँकेशीं संलग्न करून घेण्याच्या प्रश्नाकडे रिझर्व्ह बँकेनें श्रॉफ्सचा सल्ला घेऊन तत्परतेनें लक्ष द्यावें. परंतु, त्याची वाट न पहातां दर्शनी हुंड्यांच्या द्वारा धंदा कर-

णाऱ्या श्रॉफ्सनीं ९० दिवसांच्या मुदती हुंड्यांचा व्यवहार सुरू करावा. अशा हुंड्यांच्या वापरास प्रोत्साहन मिळावें म्हणून हुंड्यांवरील स्टँप ड्यूटी भारत सरकारनें उतरवावी. श्रॉफ्सच्या हुंड्या शेड्यूल्ड बँकांच्या द्वारां रीडिस्कौंट होण्यास रिझर्व्ह बँकेनें प्रोत्साहन द्यावें. त्यावाबतींत कांहीं कायद्याच्या अडचणी असतील तर रिझर्व्ह बँक कायदा दुरुस्त करावा. ज्या ठिकाणीं शाखा नाहींत, अशा ठिकाणच्या व्यापाऱ्यांनीं व लहान कारखानदारांनीं काढलेलीं व श्रॉफ्सनीं शेरा मारलेलीं बिलें रीडिस्कौंट करण्याचा उपक्रम बँकांनीं करावा; मात्र सहीदारांच्या पतीबद्दल बँकांनीं खात्री करून घ्यावी. श्रॉफसनीं हिशेबांच्या वह्या राष्ट्रीय किंवा इंग्रजी भाषेंत योग्य प्रकारें ठेवाव्या. अखिल भारतांतील श्रॉफ्सनीं संघटना करावी; तिच्या घटनेला रिझर्व्ह बँकेची मान्यता असावी. व्यापार व उद्योग ह्यांसच मुख्यत: श्रॉफ कर्जें देतात; तेव्हां सावकारी कायद्यांतून त्यांची मुक्तता व्हावी. औद्योगिक शेअर्स व डिबेंचर्स ह्यांत विमा कंपन्यांना ज्यास्त प्रमाणांत पैसे गुंतवितां यावेत, ह्यासाठी विमा कायद्याचें २७ वें कलम दुरुस्त करून विमा कंपन्यांना खालीलप्रमाणें गुंतवणूक करण्यास लावावें:—२५% सरकारी रोख्यांत, २०% सरकारी किंवा इतर मान्य रोख्यांत, उरलेले ५५% २७ अ कलमांत सांगितल्याप्रमाणें. विमा कायद्याप्रमाणें, विमा कंपन्यांना कोणत्याहि कंपनींत २½% ज्यास्त रक्कम गुंतविता येत नाहीं. तें प्रमाण ५% करण्यांत यावें. विमा कायद्यांतील विसंगती दूर करण्यांत याव्या. ज्या कंपनीला इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कर्ज देईल, त्या कंपनींत तिच्या मॅनेजिंग एजंटाची पुरेशी गुंतवणूक असेल, आणि इतर दृष्ट्याहि ती कंपनी कर्जास पात्र असेल तर मॅनेजिंग एजंटाच्या आणखी गॅरंटीचा आग्रह धरण्यांत येऊं नये. कॉर्पोरेशननें कर्जदार कंपनीशीं असा करार करावा, कीं ज्यामुळें व्याजाचा दर कमी केला जाईल पण कंपनीला नफा सुटूं लागला म्हणजे सवलतीचा दर व कॉर्पोरेशनचा नेहेमींचा दर ह्यांतील तफावत कंपनी भरून काढील. कॉर्पोरेशननें डिबेंचर्सच्या स्वरूपांत कर्जें देण्याचा प्रयत्न करावा; हीं डिबेंचर्स योग्य वेळीं, हळुहळु, बाजारांत विकतां येतील अशीं असावींत. इं. फा. कॉर्पोरेशन कायद्याच्या २३ व्या कलमाप्रमाणें, अंडररायटिंगमुळें तिच्या गळ्यांत कांहीं शेअर्स पडले तर तिनें ते ७ वर्षांचे अवधींत विकून टाकावयाचे आहेत. ही मर्यादेची अट काढून टाकण्यांत यावी. कर्जदार कंपनीला दिलेल्या कर्जाचें रूपांतर कॉर्पोरेशनला ऑर्डिनरी भागांत करतां येण्याची सवड असावी; त्या दृष्टीनें कॉर्पोरेशनने योजना आखाव्यात. मध्यवर्ती व राज्य फि. कॉर्पोरेशनन्सनीं मंजूर केलेल्या कर्जांत सहभागी होण्यास बँकांस संधि देण्यांत यावी. शेड्यूल्ड बँकांनी किंवा विमा कंपन्यांनीं दीर्घ मुदतीचीं कर्जें दिलीं असतील त्यांस गॅरंटी रहाण्याच्या प्रश्नाचा कॉर्पोरेशननें विचार करावा. मूलग्राही महत्त्वाच्या उद्योगास १ कोटी रु. पेक्षा जास्त कर्ज देण्यास हरकत नाहीं, अशी सवलत इं. फि. कॉर्पोरेशनच्या २४ व्या कलमांत असावी. फिनॅन्स कॉर्पोरेशन्सच्या दैनंदिन कारभारांत पार्लमेंटनें लक्ष घालूं नये, फक्त त्यानें धोरण आखून द्यावें; म्हणजे कॉर्पोरेशन्सची उपयुक्तता वाढेल आणि पार्लमेंटचें नियंत्रणहि पण कायम राहील. सरकारकडून पैसे मिळण्यास विलंब लागतो, त्यामुळें लहान कारखानदारांची फार अडचण होते, ती दूर करण्यासाठी सरकारनें माल पुरविणारांच्या नांवें लेटर्स ऑफ क्रेडिट उघडण्याच्या शक्यतेचा विचार करावा. स्टेट एड कायदा व कानू ह्या खाली लहान उद्योगांना प्रभावी साहाय्य व्हावयाचें असेल, तर सरकारांच्या बजेटांत ज्यास्त रकमांची तरतूद केली पाहिजे.

लहान उद्योगधंद्यांना अधिक भांडवल उपलब्ध व्हावें यासाठी एक स्पेशल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन तावडतोब स्थापण्यांत यावें. ह्या स्थापनेंत रिझर्व्ह बँकेनें पुढाकार घ्यावा व हितसंबंधीं लोकांशीं विचारविनिमय करून प्रत्यक्ष कारभाराचा तपशील ठरवावा. ह्या डेव्हलपमेंट कॉर्पोरेशननें एक खास स्वतंत्र खातें निर्माण करून लहान उद्योगधंद्यांच्या स्थापनेंत पुढाकार घ्यावा व कच्च्या मालाची सहकार्यानें खरेदी मालाच्या दर्जांत एकवाक्यता, विक्रीची संघटना, प्रचार, इत्यादि बाबतींत मदत करावी. भांडवलाच्या शेअर्सच्या उभारणीस मदत करणाऱ्या इश्यू अथवा अंडररायटिंग संस्था स्थापण्यांत याव्या. इनव्हेस्टमेंट ट्रस्ट्स आणि युनिट ट्रस्ट्स ह्यांच्या स्थापनेमुळेंहि औद्योगिक गुंतवणुकीस साहाय्य होण्याजोगे आहे. विशेषत: युनिट ट्रस्ट्स भारताच्या परिस्थितीला अधिक सोईचे होतील. सरकार–पुरस्कृत, सरकारी मालकीच्या व व्यवस्थेच्या इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या स्थापनेचे बाबतींत सरकारनें त्वरा करावी. खासगी मालकीची व व्यवस्थेची इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट व फिनॅन्स कॉर्पोरेशन भारत सरकारच्या व इंटरनॅशनल बँकेच्या साहाय्यानें स्थापन करण्याचा प्रयत्न स्वागतार्ह आहे. सरकार आणि इतर कर्जपुरवठ्याच्या संस्था ह्यांनीं तांत्रिक व व्यवस्थाविषयक तज्ज्ञ सल्ला देण्याचें मध्यवर्ती केंद्र निर्माण करावें. भारताच्या आर्थिक संसारांतील सर्व घटकांनीं जुन्यापुराण्या कल्पना सोडून दिल्या पाहिजेत व नव्यांचा उत्साहानें स्वीकार केला पाहिजे; त्याखेरीज खरी प्रगति शीघ्र गतीनें होणार नाहीं.

## गो. स. पारखे औद्योगिक मान–पारितोषिक

### लूनर कॉस्टिक कॉर्पोरेशन (इं.) लि., ला बक्षीस

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजच्या विद्यमानें प्रतिवर्षी गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकें दिलीं जातात. भारतांत व विशेषत: महाराष्ट्रांत तयार होत नसलेली अशी एकादी वस्तु बनवून ती व्यापारी दृष्ट्या यशस्वी करणाऱ्या होतकरू व कल्पक महाराष्ट्रीय कारखानदारांना, चेंबरनें नेमिलेल्या तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार, हीं पारितोषिकें देण्यांत येतात. यंदा पारितोषिकांसाठी आलेल्या वस्तूंचा समितीनें विचार करून लूनर कॉस्टिक कॉर्पोरेशन (इंडिया) लि. पुणें यांच्या सिल्व्हर नायट्रेट, एचिंग पावडर व फोटो एन्ग्रेव्हिंग ग्ल्यू या ब्लॉक–मेकर्सना लागणाऱ्या वस्तूंबद्दल २०० रु. चें पारखे पारितोषिक देण्याची शिफारस केली आहे. सदर पारितोषिक देण्याचा समारंभ बुधवार दि. १६ जून १९५४ रोजीं चेंबरच्या ओगले सभागृहांत श्री. फ. दो. पदमजी ह्यांच्या हस्तें होणार आहे.

### कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रादेशिक कचेऱ्या

जॉइंट स्टॉक कंपनी कायद्याच्या सर्व ठिकाणच्या अंमलबजावणीचें काम भारत सरकारनें स्वत:कडे घेतलें आहे. त्यास अनुसरून तीन प्रादेशिक कचेऱ्या उघडण्यांत येतील. पश्चिम विभागाची कचेरी मुंबई येथें राहील. कंपनी कायदा हा पहिल्यापासूनच मध्यवर्ती विषय असला, तरी प्रत्यक्ष काम राज्य सरकारांकडे सोपविलेलें होतें व तीं मध्यवर्ती सरकारचे एजंट म्हणून काम करीत होतीं. आतां, मध्यवर्ती सरकार तें काम स्वत:च पहाणार आहे. सबंध देशांतील धोरण व अंमलबजावणी ह्यांत एकसूत्रीपणा यावा, असा त्याचा उद्देश आहे. सध्यां चालू असलेल्या कामांत तांतडीनें बदल होणार नाहीं.

## राज्य सहकारी बँकांना कर्जें

१ जुलै, १९५३ ते ५ मार्च, १९५४ ह्या मुदतींत रिझर्व्ह बँकेनें वेगवेगळ्या राज्य बँकांना शेतीसाठीं व पिकांच्या उठावासाठीं १४·९५ कोटी रुपयांचीं कर्जें मंजूर केलीं, त्यांपैकीं १०·१९ कोटी रुपयांचीं कर्जें उचलण्यांत आलीं.

| राज्य | प्रत्यक्ष घेतलेलीं कर्जें ( लक्ष रु. ) |
|---|---|
| मद्रास | १९०६२ |
| मुंबई | ४३९·३६ |
| मध्य प्रदेश | २०·९५ |
| उत्तर प्रदेश | ४८६५ |
| ओरिसा | २१·०० |
| प. बंगाल | १८·०० |
| पंजाब | १५·२१ |
| हैद्राबाद | ४·०७ |
| सौराष्ट्र | १·७० |
| एकूण | १०,१९·२७ |

## पंजाब स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशन

३१ मार्च, १९५४ अखेर संपलेल्या पहिल्या वर्षीं वरील कॉर्पोरेशनकडे १·०८ कोटी रु. कर्जमागणीचे ८४ अर्ज आले त्यांपैकीं २८·५२ लक्ष रु. चे २० अर्ज मंजूर झाले. त्यांपैकीं ३·४५ लक्ष रु. चे ४ अर्ज रद्द होऊन २५·०७ लक्ष रु. मंजुरीचे १६ अर्ज राहिले. २ लक्ष रुपयांखालील कर्जांस ७% आणि २ लक्ष रुपयांवरील कर्जांस ६½% व्याज आकारण्यांत येतें व वक्तशीर फेड केल्यास ½% रिबेट मिळतो. वैयक्तिक कमाल कर्जमर्यादा ७·५ लक्ष रु. व किमान कर्जमर्यादा १२ हजार रु. ठरविण्यांत आली आहे. अहवाल वर्षाचे मुदतींत २९·४ हजारांची परतफेड झाली. शेअरभांडवलावर ३% डिव्हिडंडची पंजाब सरकारनें हमी घेतली आहे, त्याप्रमाणें डिव्हिडंडला २·२४ लक्ष रु. लागतील त्यांपैकीं २·०८ लक्ष रु. त्या सरकारला द्यावे लागतील.

## चेकोस्लोव्हाकियाची पहिली पंचवार्षिक योजना

१९५३ अखेर संपलेल्या, चेकोस्लोव्हाकियाच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेचे आंकडे उपलब्ध झाले आहेत. त्यावरून असें दिसतें कीं, १९४८चे मानानें औद्योगिक उत्पादन १०२% वाढलें. म्हणजे, मूळ योजनेपेक्षा तें ४५ जास्त झालें.

**ॲबिसिनीआची कर्जाची मागणी**—ॲबिसिनिआंत युरेनिअमच्या खाणी सांपडल्याचें वृत्त आहे. ह्या खाणी चालविण्यासाठीं आणि एंजिनिअरिंगची एक शाळा काढण्यासाठीं ॲबिसिनिअन सरकार अमेरिकेकडे कर्जाची मागणी करण्याच्या विचारांत आहे. त्याचप्रमाणें आदिस अबाबा येथें एक आधुनिक वसतिगृह बांधण्याचाहि सरकारचा विचार आहे.

**मानस-सरोवराची यात्रा**—प. तिबेटांत असलेल्या मानस सरोवराची यात्रा करण्यासाठीं ह्या वर्षीचे पहिले भारतीय यात्रेकरू नुकतेंच नैनीतालहून पुढें गेले. अल्मोरा जिल्ह्यांतून प. तिबेटमध्यें जाणारे सर्व घाट आतां बर्फापासून मुक्त झाले आहेत. घाटांची उंची समुद्र-सपाटीपासून १४,००० ते १७,००० फूट आहे.


# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

शाखा:—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्लें, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिक्कोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,१७,००० |
| ठेवी | रु. | ८२,२०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,०८,००,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५३ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.



# दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

**१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.**

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



# Deccan Institute of Commerce

**594, Budhwar Peth, Poona 2.**

Opens for the 1954-55 Session on Monday the 21st June 1954. Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., C. A. ( First Part ), G. D. C. & A., Dip. L. A., C. A. I. I. B.; Shorthand; Typewriting Examinations. Morning and Evening classes. Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Under-graduates, and Graduates.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें